| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२०००/२०२२ |
| सरकार -वि-पवनकुमार |
| निशाणी क्र.०८ |

## <u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची शपथेवर सरतपासणी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | बंडू सुदामजी कळमने |
| **वय** | : | ५३ वर्षे, |
| **धंदा** | : | पो.हवा. ब.क्र. ४८५० |
| **राहणार** | : | पोलीस मुख्यालय, नागपूर |

### <u>सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत</u>

दिनांक १०.०५.२०२२ रोजी मी पो.स्टे. अजनी येथे पोलीस हवालदार पदावर तपास पथकात कार्यरत होतो. माझी कर्तव्याची वेळ सकाळी ९.०० ते रात्री ९.०० अशी होती. सदर दिवशी विशेष कोंबींग गस्त होती. त्याचा कार्यकाळ १९.०० ते २३.०० पर्यंत होता. आम्ही कुकडे ले आउट परिसरामध्ये सदर गस्त करीत होतो. त्यावेळी गुप्त बातमीदारामार्फत आम्हाला माहिती मिळाली की एक इसम अंगात आकाशी रंगाचा शर्ट व निळया रंगाची फुलपॅन्ट घातलेला चोरीची लाल रंगाची प्लेझर मोटारसायकल वर फिरत आहे. सदर माहिती मी सोबतच्या कर्मचारी ए.पी.आय. खंडारे, ए.पी.आय. संघर्षी आणि पो.शिपाई भजन, देवेंद्र, अमोल, अविनाश यांना सांगितली. आम्ही तेथे दोन पंचांना बोलावून त्यांना बातमीतील माहिती दिली. सदर माहितीच्या अनुषंगाने परीसरात त्या इसमाचा शोध घेतला असता कुकडे ले आउट गार्डनजवळ तो दिसून आला.

२. आम्ही ताब्यात घेण्याकरीता जात असतांना तो पळून जाण्याचा प्रयत्न करु लागला असता त्याला सोबतच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने ताब्यात घेवून त्याचे नाव विचारले

असता त्याने त्याचे नाव पवनकुमार रामनिवास तिवारी, वय ३० वर्षे, रा. नबाबपुरा, लकडगंज पोलीस ठाणे हद्द असल्याचे सांगितले. त्याला त्याच्या ताब्यातील गाडीबाबतच्या कागदपत्रांची मागणी केली असता त्याने उडवउडवीची उत्तरे दिली. त्याच्या जवळील गाडीची पाहणी केली असता डिक्कीमध्ये एक हत्तीमार चाकू एकूण लांबी ६६ सेमी त्यापैकी पात्याची लांबी ३१ सेमी, मध्यभागी रुंदी ५ सेमी व मुठीची लांबी ३५ सेमी असल्याचे दिसून आले. आरोपीला शस्त्र बाळगण्याच्या परवान्याची विचारणा केली असता त्याच्याकडे परवाना नसल्याचे त्याने सांगितले.

३. घटनास्थळी पंचनामा कार्यवाही केली. चाकू व लाल रंगाची प्लेझर गाडी क्र. एमएच-३१/डीपी-७६९७ जप्त केली. आता मला पंचनामा दाखविण्यात आला तो तोच असून त्यावर माझी व पंचांची सही आहे तसेच आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी पी-१</u>** देण्यात आला. जप्त चाकू मला दाखविल्यास मी ओळखू शकेल.

४. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात येवून आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी पी-२</u>** देण्यात आला. आता मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली ती तीच असून त्यावर माझी व दाखल अधिकारी यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी पी-३</u>** देण्यात आला.

५. आता मला कलम ३७ प्रमाणे आदेशाची सत्यप्रत दाखविण्यात आली. त्यास **<u>निशाणी पी-४</u>** देण्यात आला. मी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाची सत्यप्रत दोषारोपपत्रात

समाविष्ठ केली आहे. आता मला दाखविण्यात आलेली सत्यप्रत तीच आहे. त्यास **निशाणी पी-५** देण्यात आला.

६. आरोपीला अटक करुन त्याचा अटकफार्म भरला. आता मला दाखविण्यात आलेला अटक फार्म तोच असून त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी-६** देण्यात आला. आरोपीला अटक केल्याबाबतच्या नोंदीचा स्टेशनडायरीचा उतारा मी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी-७** देण्यात आला.

७. मी माझ्यासोबतच्या ४ पोलीस कर्मचाऱ्यांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**(अभियोगपक्षातर्फे सरकारी वकीलांनी मुदतीचा अर्ज (निशाणी क्र.९) दाखल केल्याने उर्वरीत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब. )**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

JYOTI VILAS PEKHALE

Digitally signed by JYOTI VILAS PEKHALE
Date: 2025.06.10 16:08:56 +0530

**(ज्यो.वि. पेखळे-पुरकर)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १०.०६.२०२५